भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500
FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये
सत्यमेव जयते
Rs. 500
INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2022 ◑ BS 110183

अनु.क्र. 26306 दि. 22/9/2022 मु.शु.रक्कम 500

दस्ताचा प्रकार हमीपत्र

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय/नाही.

मिळकतीचे वर्णन

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव लोहिया जैन रिअल्टी LLP

पत्ता भांडारकर रोड पुणे

दुसऱ्या पक्षकाराचे नांव PMRDA

हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता अशोक जाधव धानोरि पुणे

शुभांगी सुहास बनकर
परवाना क्र. २२०११९७

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही १३४४ शिवाजीनगर पुणे म न पा समोर.

प्रथम मुद्रांक लिपिक
कोषागार पुणे क

19 SEP 2022

NOTARY
MAMTA K. SHAH
PUNE DIST.
REGD. NO. 9057
EXPIRY DATE
20/10/2026
GOVERNMENT OF INDIA

हमीपत्र

LOHIA JAIN REAL...

हमीपत्र आज दिनांक / /२०२२ इसवी ते दिवशी.

मी/ आम्ही, मे. लोहिया जैन रियाल्टी एल.एल.पी.तर्फे भागीदार श्री. प्रदिप शांतीलाल जैन व इतर, वय-.....वर्षे, धंदा- व्यवसाय, राहणार - लोहिया जैन हाऊस, ८९३/६, भांडारकर रोड, पुणे -४११ ००४. हमीपत्र लिहून देतो की,

मौजे मुकाईवाडी, ता. मुळशी, जि.पुणे येथील स. नं. ११, १२ व १३(पैकी), पुणे यांसी एकूण क्षेत्र १२५०८०.००चौ.मी. या मिळकतीमध्ये निवासी/ बिगर निवासी पद्धतीचा प्लॉटचे बांधकामाबाबत प्रस्ताव जागामालक / कुलमुखत्यारपत्रधारक म्हणून मी/आम्ही दाखल केला आहे. तूर्त या जागी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे/ ग्रामपंचायत कडून पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकत नाही. याची माहिती मला/आम्हाला देण्यात आली असून याला पर्याय म्हणून जागेवरील बोअरद्वारा पाणी उपलब्ध करुन देण्याची किंवा टँकरद्वारा पाणी मिळण्याची व्यवस्था करित आहोत. व त्यासंबंधी आवश्यक त्या वरीष्ठ भूवैज्ञानिक अधिकारी, भुजल सर्व्हेक्षण आणि विकास योजना (G.W.S & D.A.) या कार्यालयामार्फत किंवा तत्सम तांत्रिक सल्लागारामार्फत सदर जागी पाणी असल्याबद्दलचे प्रमाणपत्र आणून देणेची कार्यवाही करणे आमचेवर बंधनकारक राहील.

२) इमारत पूर्ण झाल्यावर इमारतीमधील निवासी / बिगर निवासी वापरासाठी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे/ ग्रामपंचायत पिण्यासाठी पुरेसा पाणी पुरवठा पुरेशा दाबाने करु शकत नसल्यास पाण्याची पर्यायी व्यवस्था प्रवर्तक या नात्याने इमारतींमधील रहिवाशांच्या खर्चाने करून देण्यास तयार असून त्याची सर्व जबाबदारी मी/आम्ही या हमीपत्राद्वारे स्विकारत आहे.

३) पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे/ ग्रामपंचायत मार्फत कोणताही पाणीपुरवठा सुरु न झाल्यास किंवा अपुरा झाल्यास मी / आम्ही कोणत्याही कोर्टाकडे या बाबतीत दावा दाखल करणार नाही.

४) निवासी अगर व्यापारी गाळ्याचे विक्रिचे बुकींग करतांना येणाऱ्या करारनाम्यामध्ये पाणी पुरवठ्याची वरीलप्रमाणे सर्व वस्तुस्थिती विशेष बाब म्हणून नमूद करुन घेण्याची जबाबदारी राहील. जागेवरील परिस्थितीची जाणीव नियोजीत गाळेधारकांना करुन दिल्यानंतरसुद्धा या ठिकाणी होणाऱ्या बुकींगनंतर होणाऱ्या नियोजीत गाळेधारकांना पाणी पुरवठा अपुरा झाला तर पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे/ ग्रामपंचायत चा पुरेसा पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत फ्लॅट धारकाच्या खर्चाने पुरेसा पाणी पुरवठा करुन देण्याची माझी/आमची जबाबदारी राहील. पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे/ ग्रामपंचायत ला तोशीष लागू देणार नाही.

५) टँकरद्वारा किंवा बोअरद्वारा सध्या मिळणाऱ्या पाण्याचे नमुने वेळोवेळी प्रयोगशाळेतून तपासून आणणे व त्या रिपोर्टनुसार पाणी योग्य आढळल्यास पाणी वापरण्यात येईल, याची मी/आम्ही काळजी घेईन/घेऊ.

६) सदरची योजना संपूर्णरित्या प्रवर्तक/मालक या नात्याने मी/आम्ही अन्य ... काळात विकल्यास नवीन मालक / प्रवर्तकास या हमीपत्रातील सर्व बाबींची लेखी कल्पना देईन त्याचा समावेश नवीन करारनाम्यात करण्यांत येईल याची काळजी घेईन/घेऊ.

७) हे हमीपत्र माझे/आमचे वालीवारसांवर बंधनकारक राहील.

८) सदर प्लॉटमधील संदर्भातील कोणत्याही होणाऱ्या करारामध्ये या हमीपत्राचा समावेश करण्यात येईल व हे हमीपत्र करारनाम्यातील विशेष बाब म्हणून समजण्यात येईल.

वरील हमीपत्र मी / आम्ही राजीखुषीने दि. / /२०२२ रोजी लिहून दिले आहे.

पुणे

दिनांक : / /२०२२

हमीपत्र लिहून देणार

मे. लोहिया जैन रियाल्टी एल.एल.पी.

तर्फे भागीदार

LOHIA JAIN REALTY LLP

Pradeep

श्री. प्रदिप शांतीलाल जैन

NOTED AND REGISTERED
AT SR. NO. 15820/2022
DATE 22 SEP 2022

NOTARY — MAMTA K. SHAH, PUNE DIST., REGD. NO. 9057, EXPIRY DATE 20/10/2026 — GOVERNMENT OF INDIA

BEFORE
MAMTA K...
NOTA...
GOVT. O...
PUNE DI...

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL